# वसई विरार शहर महानगरपालिका

## मा. सर्वसाधारण सभा दिनांक 31 /08/2019

## सभा सुचना क्रं. 5 सायं 4.30 वा.

| | विषयाचे नाव | मा. सर्वसाधारण सभेचा निर्णय |
|---|---|---|
| 1. | मागील मा. विशेष सर्वसाधारण सभा दि. ०५/०८/२०१९ रोजीचे कायम केलेले इतिवृत्त माहितीस्तव. | **ठराव** :- मागील मा. विशेष सर्वसाधारण सभा दि. 05/08/2019 रोजीचे कायम केलेल्या इतिवृत्तास ही सभा मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- (रूपेश जाधव) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| 2. | प्रश्नोत्तरे | निरंक |
| 3. | शासकीय पत्रव्यवहार माहितीस्तव | |
| 4. | **वसई विरार शहर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती एफ धानिव/पेल्हार मधील कै. सुरसेन कृष्णाजी घरत वरिष्ठ लिपिक यांचर पत्नी श्रीम. सुरेखा सुरसेन घरत हयांना महानगरपालिका सेवेत अनुकंपा तत्वावर नियुक्ती देणेबाबत** | **निर्णय/ठराव:-** वसई विरार शहर महानगरपालिकेतील कर्मचारी कै. सुरसेन कृष्णाजी घरत, वरिष्ठ लिपीक प्रभाग समिती - एफ, धानिव/पेल्हार हे सेवेत असताना दि. 28/11/2018 रोजी दिवंगत झाल्याने त्यांचे पश्चात त्यांची वारस पत्नी श्रीमती सुरेखा सुरसेन घरत यांना महानगरपालिकेच्या सेवेत अनुकंपातत्वावर "मजूर" या पदावर खुल्या प्रवर्गातून नियुक्ती देण्यास आजची ही सभा मंजूरी देत आहे.<br>**अनुमोदक :- (जयश्री किणी) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| 5. | **कै. काजू भिमा पुरबिया , सफाई कामगार यांच्या जागी त्यांचा वारस मुलगा श्री. अक्षय काजू पुरबिया यांना वारसा हक्काने सफाई कामगार या पदावर नियुक्ती करणेबाबत.** | **निर्णय/ठराव:-** वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती -सी, चंदनसार, विरार विभाग आस्थापनेवरील कर्मचारी कै. काजू भिमा पुरबिया सफाई कामगार हे दिनांक 26/02/2007 मयत झालेले असुन त्यांचा मुलगा श्री. अक्षय काजू पुरबिया हे सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांचेकडील शासन परिपत्रक दिनांक 21 ऑक्टोबर, 2011, |

| | | |
|---|---|---|
| | | शासन परिपत्रक दिनांक 26 फेब्रुवारी, 2014 व शासन निर्णय दिनांक 11 मार्च, 2016 मधील तरतुदीनुसार वारसहक्क नियुक्तीसाठी पात्र असल्याने त्यांना लाड समितीच्या शिफारसीनुसार वारस हक्काने महानगरपालिका सेवेत "सफाई कामगार" या पदावर सामावुन घेणेस ही महासभा मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- (यज्ञेश्वर पाटील) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| 6. | **वसई विरार शहर महानगरपालिकेत समाविष्ट तत्कालीन ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना नविन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना (Defined contribution Pension scheme) लागू करुन सदर योजना राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजना (National Pension Scheme) मध्ये समाविष्ट करणे तसेच महानगरपालिका स्थापनेनंतर महापालिकेत वर्ग झालेल्या ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांपैकी सेवा निवृत्त वा मयत झालेल्या कर्मचाऱ्यांना तद्अनुषंगीक लाभ अदा करणेबाबत.** | **प्रस्तावाचा ठराव व निर्णय:-**<br>वसई विरार शहर महानगरपालिकेची स्थापना दि.3 जुलै, 2009 रोजी झाली. वसई विरार शहर महानगरपालिकेत समाविष्ट 55 महसूली गावातील तत्कालीन ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना "परिभाषीत अंशदान निवृत्तीवेतन योजना" (Defined contribution pension scheme) दि.3 जुलै, 2009 पासून लागू करणेस ही सभा मान्यता देत आहे. सदर कर्मचाऱ्यांचे या योजनेत ठरवून दिलेले अनुषंगिक विहीत नमुन्यातील अद्ययावत लेखे तयार करून कर्मचाऱ्यांचे कोणतेही नुकसान होणार नाही, याची दक्षता प्रशासनाने घ्यावी. जरी महानगरपालिकेने सदर कर्मचाऱ्यांच्या वेतनातून 6 टक्के किवा त्यापेक्षा जास्त वर्गणी कपात केली असली तरी महापालिकेने वेतन + ग्रेडवेतन + महागाई भत्ता यावर देय असलेले 10 टक्के अंशदान सदर कर्मचाऱ्यांना देण्यात यावे. तसेच प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे जे कर्मचारी सेवानिवृत्त व मयत झाले आहेत त्या कर्मचाऱ्यांना द्यावयाचे तद्नुषंगिक आर्थिक लाभ पूर्वलक्षी प्रभावाने अदा करण्यात यावेत.शासनाने दि.27/8/2014 च्या शासन निर्णयान्वये "परिभाषीत अंशदान निवृत्तीवेतन योजना" ही "राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना" (National pension scheme) मध्ये समाविष्ट केलेली आहे. सदर पेन्शन योजना स्विकारून महानगरपालिकेत उपरोक्त तत्कालीन ग्रामपंचायतींमधील समाविष्ट झालेले कर्मचारी व दि.1 नोव्हेंबर, 2005 नंतर लागलेले तत्कालीन नगरपरिषदेतील कर्मचारी, तसेच नव्याने नियुक्त होणारे कर्मचारी यांचा सदर योजनेत समावेश करणेस आजची सभा मान्यता देत आहे. त्याचप्रमाणे उपरोक्त योजनांअंतर्गत कर्मचाऱ्यांचे लेखे लिहीताना सन 2005 पासून शासनाने विहीत केलेले अंशदानाचे व व्याजाचे दर हे लागू राहतील. यापुढे शासन सदर |

| | | |
|---|---|---|
| | | योजनांमध्ये ज्या प्रमाणात अंशदानात अथवा व्याजाच्या दरात वाढ किंवा घट करेल ते ते दर त्यावेळेस लागू होतील. त्यासाठी पुन्हा मंजूरी घेण्याची आवश्यकता राहणार नाही.<br>**अनुमोदक :- (सखाराम महाडिक) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| 7. | **प्रभाग समिती अ मधील विरार (प) प्रभाग क्र.17 मध्ये स.नं. 401 येथे सांस्कृतिक भवन बांधणे (टप्पा -2 ) या कामी प्रशासकीय व वित्तीय मंजूरी मिळणेबाबत.** | **ठराव :-सदर** कामी होणाऱ्या अंदाजपत्रकीय रक्कम 1,86,76,230/- या खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे. व सदर कामी ई-निविदा दर मागविण्यात यावेत असे ही सभा ठरविते .<br>**अनुमोदक :- (सखाराम महाडिक) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| 8 | **प्रभाग समिती जी कार्यक्षेत्रातील वॉर्ड नं. 105 मध्ये जुचंद्र येथील जुचंद्र नायगांव मुख्य रस्ता ते सोमेश्वर नगर पर्यंत रस्ता सिमेंट काँक्रीटने बांधणे कामाचे अंदाजपत्रकीय रक्कमेस प्रशासकीय व वित्तीय मंजूरी मिळणेबाबत.** | **ठराव** :- वरीलप्रमाणे प्रस्तावाबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली सदर कामाचे रुक्कम रु. 1,57,09,851/- च्या अंदाजपत्रकास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देत आहे हया कामी निविदा दर मागविण्यात यावेत असे ही सभा ठरविते.<br>**अनुमोदक :- (कन्हैय्या भोईर) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| 9. | **वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती आय कार्यक्षेत्रातील वॉर्ड क्र. 107 चोबारे तलावाच्या पाठीमागे मौजे चोबारे येथील आ.क्र. 721 क्रिडांगणकरीता माती भराव करणेकामी आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.** | **ठराव** :- वरील विषयाबाबत सभागृहात सविस्तर चर्चा करणेत आली वरील कामी तयार करणेत आलेल्या रु.3,11,83,767/- इतक्या रक्कमेच्या अंदाजपत्रकास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देत आहे. त्यानुसार सदर कामाचे अंदाजपत्रकास आवश्यक तांत्रिक मंजूरी घेवून निविदेची कार्यवाही करणेस, तसेच त्याकामी अनुषंगाने येणाऱ्या इतर अनुषंगीक खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देत आहे.<br>**अनुमोदक :- (ज्योती धोंडेकर) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |

| | | |
|---|---|---|
| 10. | **वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती आय कार्यक्षेत्रातील मौजे चोबारे येथील उमेळा फाटा रोड ते अस्तित्वातील स्मशानभूमी ते आ.क्र 719 पर्यंत 20 मीटर डी.पी रस्ता विकसीत करणेकामी आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.** | **ठराव :-** वरील विषयाबाबत सभागृहात सविस्तर चर्चा करणेत आली. वरील कामी तयार करणेत आलेल्या रु. 3,93,53,231/- इतक्या रक्कमेच्या अंदाजपत्रकास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देत आहे. त्यानुसार सदर कामाचे अंदाजपत्रकास आवश्यक तांत्रिक मंजूरी घेवून निविदेची कार्यवाही करणेस, मा.आयुक्त हयांनी मा. महासभेपुढे शिफारस केली आहे. तसेच त्याकामी अनुषंगाने येणा-या इतर अनुषंगीक खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देत आहे.<br>**अनुमोदक :- (ज्योती धोंडेकर) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| 11. | **वसई विरार शहर महानगरपालिकेतील प्रभाग समिती डी प्रभाग क्र 80 मध्ये विद्याविकासीनी शाळा ते भोयदापाडा मुख्य रस्ता (12 मीटर डी.पी.) विकसीत करणेकामी अंदाजपत्रकीय रक्कमेस प्रशासकीय व वित्तीय मंजूरी मिळणेबाबत.** | **ठराव :-** वरीलप्रमाणे प्रस्तावाबाबत सविस्तर चर्चा होऊन उपरोक्त नमुद कामी होणाऱ्या रक्कम रु. 1,04,13,301/- खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देण्यात येत आहे पुढील निविदा कार्यवाहीस मान्यता देण्यात येत आहे<br>**अनुमोदक :- (शकुंतला शेळके) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| 12. | **वसई विरार शहर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात वसई येथील माणिकपूर परिसरात महानगरपालिकेची अत्याधुनिक वैद्यकीय सेवा टप्प्या टप्प्याने सुरु करणेकरीता मान्यता मिळणेबाबत.** | **/ निर्णय :-** वसई विरार शहर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील वसई येथिल माणिकपूर परीसरात महानगरपालिकेचे अत्याधुनिक वैद्यकीय सेवा केंद्र स्थापन करण्याबाबतच्या विषयावर सभागृहात सविस्तर चर्चा होऊन असा निर्णय घेण्यांत आला की, वसई येथिल माणिकपूर परीसरात तज्ञ डॉक्टरांचे बाहय रूग्ण विभाग सुरु करणेकामी आवश्यक असणारी औषधे व साहित्य खरेदी इत्यादी करणेकामी सद्यस्थितीत येणाऱ्या संपूर्ण खर्चास तसेच अत्याधुनिक वैद्यकीय सेवा टप्प्या टप्प्याने सुरु करणेस व भविष्यात टप्प्या टप्प्याने नविन सुविधा सुरु करणेकामी होणाऱ्या खर्चाकरीता त्या त्या वेळेस मा.स्थायी समितीची मंजुरी घेऊन वेळोवेळी खर्च करणेस ही सभा मंजुरी देत असुन याकामी येणाऱ्या संपुर्ण खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- (वृंदेश पाटील) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |

| | | |
|---|---|---|
| 13. | **वसई विरार शहर महानगरपालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागा अंतर्गत विनामानधन वैद्यकीय सेवा देत असलेल्या तसेच निश्चित केलेल्या मानधनापेक्षा कमी किंवा (नाममात्र) मानधनावर वैद्यकीय सेवा पुरवित असलेल्या तज्ञ डॉक्टरांना भविष्यात सक्षम अधिकारी यांच्य आदेशाने मानद डॉक्टर म्हणून नियुक्ती आदेश देण्यास मंजुरी मिळण्याबाबत.** | **ठराव/निर्णय** :- वसई विरार शहर महानगरपालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागांतर्गत विनामानधन वैद्यकीय सेवा देत असलेल्या तसेच निश्चित केलेल्या मानधनापेक्षा कमी किंवा (नाममात्र) मानधनावर वैद्यकीय सेवा पुरवित असलेल्या तज्ञ डॉक्टरांना भविष्यात सक्षम अधिकारी यांच्या आदेशाने मानद डॉक्टर म्हणून नियुक्ती आदेश देण्यास मंजुरी मिळण्याबाबतच्या विषयावर सभागृहात सविस्तर चर्चा होऊन असा निर्णय घेण्यात आला की, वैद्यकीय सेवा ही अत्यावश्यक सेवा असल्याने महानगरपालिकेच्या वैद्यकीय सेवांसाठी अपुरा पडत असलेले तज्ञ डॉक्टर्स अशा डॉक्टरांची नियुक्ती करण्याकामी किमान वेळेत नियुक्ती प्रक्रिया होण्यास, तसेच रुग्णांना अशा डॉक्टरांची वैद्यकीय सेवा तातडीने मिळण्यास सोयीस्कर होणेकामी वेळोवेळी येणाऱ्या विना मानधन तत्वावर किंवा नाममात्र मानधन तत्वावर सेवा पुरविण्यास इच्छुक तज्ञ डॉक्टरांचे अर्ज स्विकारून सक्षम अधिकारी यांच्या आदेशाने मानद डॉक्टर म्हणून नियुक्ती आदेश देण्यास ही सभा मंजूरी देत आहे.<br><br>**अनुमोदक :- (भुपेंद्र पाटील) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| 14. | **वसई विरार शहर महानगरपालिकेच्या वैद्यकीय सहाय्य व आरोग्य समितीच्या शिफारशीनुसार रुग्णालये, माता बाल संगोपन केंद्रे, नागरी प्राथमितक आरोग्य केंद्रे दवाखाने, वैद्यकीय आरोग्य विभाग आय.सी.यु व डायलेसिस सेंटर यासाठी आवश्यक असलेले तज्ञ वैद्यकीय अधिकारी व एम.बी.बी.एस. वैद्यकीय अधिकारी वर्ग तात्पुरता स्वरुपात 6 महिन्याच्या कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने दर दोन महा थेट मुलाखती घेवुन नियुक्त करणेस मान्यता मिळणेबाबात.** | **ठराव / निर्णय** :- वसई विरार शहर महानगरपालिकेच्या रुग्णालये, माता बाल संगोपन केंद्रे, नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रे, दवाखाने, वैद्यकीय आरोग्य विभाग, आय.सी.यू. व डायलेसीस सेंटर यासाठी आवश्यक असलेले तज्ञ वैद्यकीय अधिकारी व एम.बी.बी.एस. वैद्यकीय अधिकारी वर्ग तात्पुरत्या स्वरूपात 6 महिन्याच्या कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने दर दोन महा थेट मुलाखती घेवून नियुक्त करणेस मान्यता मिळणेबाबतच्या विषयावर सभागृहात सविस्तर चर्चा होऊन असा निर्णय घेण्यात आला की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 मधील कलम 53(3) या मा. आयुक्त यांना असलेल्या अधिकारा अंतर्गत तात्पुरत्या स्वरुपात 6 महिन्यांच्या कालावधी साठी कंत्राटी पध्दतीने विविध विषयाचे तज्ञ वैद्यकीय अधिकारी व एम.बी.बी.एस. वैद्यकीय अधिकारी वर्ग 6 महिन्याच्या कंत्राटी पध्दतीने मुलाखतीची प्रक्रियेस आवश्यकतेनुसार उपलब्ध होत नसल्याने दर दोन महा थेट मुलाखती घेवून सदरची पदे आवश्यकता असल्यास रिक्त असलेल्या विविध विषयांचे तज्ञ वैद्यकीय अधिकारी व एम.बी.बी.एस. वैद्यकीय अधिकारी |

| | | |
|---|---|---|
| | | वर्गाच्या पदासाठी थेट मुलाखती घेवून 6 महिन्याच्या कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने अस्थायी स्वरुपात नियुक्त करणेकामी वर्तमान पत्रात जाहिर सुचना प्रसिध्द करुन दर दोन महा मुलाखती द्वारे पदभरती करणेस व याकामी येणाऱ्या संपूर्ण खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- (भुपेंद्र पाटील) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| 15. | **वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील माहे जुलै/ ऑगस्ट 2019 मध्ये अतिवृष्टी झालयामुळे ज्या नागरीकांचे आर्थिक नुकसान झाले अशा नागरीकांना मालमत्ता करात सुट मिळणेबाबत.** | **ठराव** :- सदर प्रस्तावाचे सभेमध्ये वाचन केले असता वसई-विरार शहर महानगरपालिका हद्दीत माहे जुलै 2019 व ऑगस्ट 2019 या महात अतिवृष्टी झाल्यामुळे शहरातील ज्या मालमत्ता धारकांचे आर्थिक नुकसान झाले अशा मालमत्ता धारकांची नावे शासनाच्या (तहसीलदार कार्यालय) यादीत आलेली आहेत अशा मालमत्ता धारकांना सन 2019-20 च्या (शिक्षण कर, रोजगार हमी कर, वृक्ष कर व अग्निशमन कर वगळून) सामान्य करातून सुट देण्यात येत आहे. तसेच ज्या मालमत्ता धारकांनी सन 2019-20 या वित्तीय वर्षाचा मालमत्ता कराचा भरणा केलेला आहे अशा मालमत्ता धारकांना सन 2020-21 या वित्तीय वर्षाच्या मालमत्ता करात सुट देण्याकरीता हि सभा मंजूरी देत आहे.<br>**अनुमोदक :- (उमेश नाईक) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| 16. | **वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील अनधिकृत मालमत्तांना नळ कनेक्शनसाठी आकारवयाच्या विशेष पाणीपट्टीच्या दरांना मान्यता मिळणेबाबत.** | **ठराव** :- उपरोक्त विषयावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरविण्यांत आले की, महानगरपालिका क्षेत्रात यापुर्वी पासून अस्तित्वात असलेल्या अनधिकृत मालमत्तांच्या नळजोडण्यांसह नव्याने मंजूर करण्यात आलेल्या अनधिकृत मालमत्तांच्या नळ जोडण्यांसाठी प्रचलित पाणीपट्टी दरांच्या 25% वाढीव दराने आकारणी करण्यात येऊ नये. त्यांना प्रचलित दराप्रमाणेच पाणीपट्टी आकारणी करावी तसेच ज्या विभागांनी 25% वाढीव दराने पाणीपट्टी आकरणी करून देयके बजावली आहेत अशा विभागांनी प्रचलित दरानूसार पाणीपट्टी आकारणी करून सुधारीत देयके नळजोडणी धारकांना बजाविण्यास व त्यानुसार पाणीपट्टी वसूलीची कार्यवाही करण्यांस होणाऱ्या खर्चास हि सभा सर्वानुमते मंजूरी देत आहे.<br>**अनुमोदक :- (उमेश नाईक) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |

| | | |
|---|---|---|
| 17. | **महाराष्ट्र राज्यातील सांगली,सातारा,कोल्हापूर व कोकण विभागात अतिवृष्टीमुळे बाधित झालेल्यांना वित्तीय सहाय्य देणेस मंजुरी देणेबाबत.** | **ठराव/निर्णय** :- सादर केलेल्या प्रस्तावानुसार वसई-विरार शहर महानगरपालिकेमार्फत पुरग्रस्तांना मदत करणेकामी रक्कम रु. 25,00,000/- (रुपये पंचवीस लक्ष मात्र) धनादेशाद्वारे मा.मुख्यमंत्री सहाय्यता निधीस अदा करणेस व त्याकामी होणाऱ्या खर्चास वित्तीय मंजूरी देण्यात येत आहे.<br>**अनुमोदक :- (उमेश नाईक) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |

**नगरसचिव,**
**वसई विरार शहर महानगरपालिका**